लोकमत

लता मंगेशकर यांच्या निधनामुळे रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा स्वर कायमचा निमाला आहे. त्यांचे शिवाजी विद्यापीठाशीदेखील स्नेहाचे नाते होते. यांच्या स्वरांनी भारतातीलच नव्हे, तर जगभरातल्या संगीत रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविले.

- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू

0 7 FEB 2022
पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मातेच्या कुशीतील निरागस बालकासारखा आनंद

## शिवाजी विद्यापीठ डी.लिट. पदवी प्रदान कार्यक्रमात लतादीदींनी केल्या होत्या कृतज्ञ भावना

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठासारख्या मोठ्या शैक्षणिक संस्थेकडून डी.लिट. ही सन्मानदर्शक पदवी स्वीकारताना 'आईच्या कुशीतील निरागस बालकाचा आनंद मनी दाटला आहे', अशी भावपूर्ण प्रतिक्रिया गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी व्यक्त केली होती.

शिवाजी विद्यापीठाने २१ नोव्हेंबर १९७८ रोजी डी.लिट. ही सर्वोच्च सन्मानदर्शक पदवी प्रदान करून त्यांचा गौरव केला. तत्कालीन कुलगुरू डॉ. बी. एस. भणगे यांच्या हस्ते मंगेशकर यांना डी. लिट. पदवी प्रदान करण्यात आली होती. यावेळी लता मंगेशकर यांना विद्यापीठातर्फे प्रदान केलेल्या गौरवपत्राचे वाचन केले होते.



**कोल्हापूर : गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना शिवाजी विद्यापीठाच्या वतीने डी.लिट. ही सर्वोच्च पदवी प्रदान करण्यात आली. याप्रसंगी मानपत्राचे वाचन करताना तत्कालीन कुलगुरू डॉ. बी. एस. भणगे. शेजारी बॅ. आप्पासाहेब पंत.**

दीनानाथ मृत्यूशय्येवर असताना त्यांनी लहानग्या लताला जवळ बोलावून सांगितले, 'माझा तंबोरा, चीजांची वही, मंगेशाची कृपा मी तुला देत आहे. दुसरं तुला देण्यासारखं आता माझ्याजवळ काही उरलं नाही. गळ्यातला पंचम सांभाळ, तोच तुला सर्व काही देईल'. आपल्या कन्येसाठी स्वरांचा जो कल्पवृक्ष दीनानाथांनी लावला, त्यातून सुवर्णाचे फलभार अखंड ओथंबू लागले. त्यांची भविष्यवाणी खरी ठरली. कुमार गंधर्वांनी लताबाईंच्या संबंधी म्हटले आहे, 'भारतीय गायिकांत लताच्या तोडीची गायिका दुसरी झालीच नाही'. तीन साडेतीन मिनिटांचं तिचं ध्वनिमुद्रित गीत व शास्त्रीय गायकांची साडेतीन तासांची मैफल या दोहोंचं कलात्मक मूल्य एकच आहे, असं मानता, असा कलाकार शतकाशतकांतून एखादाच निर्माण होतो. तो आपल्या डोळ्यांसमोर वावरताना दिसतो, हे आपले केवढे भाग्य!

भालजी पेंढारकर म्हणतात त्याप्रमाणे, 'लताबाई खरोखरीच भगवंताची बासरी आहेत. या जादूगार गळ्याने किती एकाकी जीवांना आधार व आसरा दिला आहे. दूर, वैराण प्रदेशात देशाची रखवाली करणाऱ्या सैनिकांनी व सेनानींनी कबूल केले आहे की, लताबाईंच्या सुरात त्यांना आपली घरदारं दिसतात आणि ते आपले एकाकीपण विसरू शकतात', असे गौरवपत्रात म्हटले होते.

**प्रत्येकाला संगीतातून आनंद व समाधान देण्यासाठी प्रतिबद्ध**

डी.लिट. स्वीकारल्यानंतर लता मंगेशकर यांनी छोटेखानी भाषणात विद्यापीठाप्रती कृतज्ञता व्यक्त केली होती. आयुष्यात आजवर अनेक सन्मान लाभले, मात्र शिवाजी विद्यापीठासारख्या शैक्षणिक संस्थेने केलेल्या गौरवाचे मोल शब्दातीत आहे. याप्रसंगी माझ्या मातापित्यांची खूप आठवण होत आहे. समाजातल्या प्रत्येक घटकाला संगीताच्या माध्यमातून आनंद व समाधान देण्यासाठी प्रतिबद्ध राहीन, याची ग्वाही या निमित्ताने देते, असे त्यांनी भाषणात सांगितले होते.

पुढारी

लता मंगेशकर यांचे कोल्हापूर व शिवाजी विद्यापीठाशी स्नेहाचे नाते होते. २१ नोव्हेंबर १९७८ रोजी विद्यापीठाने त्यांना डी.लिट. ही मानद पदवी प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव केला होता. त्यांच्या आवाजाची मोहिनी कायम राहणार आहे. संगीत क्षेत्रात स्वयंप्रज्ञेने तळपणारी गानसम्राज्ञी काळाच्या पडद्याआड गेली आहे.

**- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

पुढारी

स्वरसाम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांच्या निधनाने संगीत क्षेत्राची न भरून येणारी अपरिमित हानी झाली आहे. मोठा सांगीतिक ठेवा रसिक अभ्यासकांसाठी मागे ठेवून गेल्या आहेत. त्या आपल्यात नसल्या तरी सांगीतिक कारकिर्दीच्या रूपाने कायम आजरामर राहणार आहेत.

- **डॉ. अंजली निगवेकर**, विभागप्रमुख, संगीत व नाट्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ

पुण्यनगरी



# शिवाजी विद्यापीठाची डी.लिट.

शिवाजी विद्यापीठासारख्या मोठ्या शैक्षणिक संस्थेकडून डी.लिट. ही सन्मानदर्शक पदवी स्वीकारताना आईच्या कुशीतील निरागस बालकाचा आनंद आपल्या मनी दाटला आहे, अशी भावपूर्ण प्रतिक्रिया लता मंगेशकर यांनी व्यक्त केलेली होती. शिवाजी विद्यापीठाने त्यांना दि. २१ नोव्हेंबर १९७८ रोजी डी.लिट. ही सर्वोच्च सन्मानदर्शक पदवी प्रदान करून गौरवले आहे. तत्कालीन कुलगुरू डॉ. बी. एस. भणगे यांच्या हस्ते पदवी प्रदान केली होती. बॅ. अप्पासाहेब पंत या दीक्षान्त समारंभाचे प्रमुख अतिथी होते.

(छायाचित्र सौजन्य : सेमिनार विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

पुण्यनगरी

# रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले

लता मंगेशकर यांच्या निधनामुळे विसाव्या शतकावर आणि रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा स्वर कायमचा निमाला आहे. त्यांचे शिवाजी विद्यापीठाशी स्नेहाचे नाते होते. २१ नोव्हेंबर, १९७८ रोजी शिवाजी विद्यापीठाने त्यांना सर्वोच्च डी.लिट. ही मानद पदवी तत्कालीन कुलगुरू डॉ. बी. एस. भणगे यांच्या हस्ते प्रदान करून त्यांच्या कार्याचा कृतज्ञ गौरव केला होता. त्यांच्या स्वरांनी गत शतकभरात भारतातीलच नव्हे, तर जगभरातल्या संगीत रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. येथून पुढेही पिढ्यान् पिढ्यांवर त्यांच्या आवाजाची मोहिनी कायम राहणार आहे. संगीताच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांची संपूर्ण कारकीर्द म्हणजे एक कार्यशाळाच होती. त्यांच्या निधनामुळे संगीताच्या क्षेत्रात स्वयंप्रज्ञेने तळपणारी गानसम्राज्ञी काळाच्या पडद्याआड गेली आहे.

–डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

सकाळ




गानसम्राज्ञी 'भारतरत्न' लता मंगेशकर यांना शिवाजी विद्यापीठाने १९७८ मध्ये डी.लिट. ही सर्वोच्च सन्मानदर्शक पदवी प्रदान करून गौरविले. २१ नोव्हेंबर १९७८ ला लता मंगेशकर यांना डी.लिट. प्रदान सोहळ्यात तत्कालीन कुलगुरू डॉ. बी. एस. भणगे. व्यासपीठावर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे बॅरिस्टर आप्पासाहेब पंत.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाने दिली डी. लिट.

लता मंगेशकर यांना शिवाजी विद्यापीठातर्फे बॅरिस्टर अप्पासाहेब पंत यांच्या हस्ते २१ नोव्हेंबर १९७८ मध्ये डी. लिट. देऊन सन्मानित केले. तत्कालीन कुलगुरू डॉ. भा. शं भणगे यांनी लता मंगेशकर यांना डी. लिट. देताना कोणता निकष लावला होता, अशी विचारणा झाली होती. त्यावेळी त्यांनी दिलेले उत्तर अतिशय समर्पक होते. डॉ. भणगे एकदा विद्यापीठाच्या कामानिमित्त दौऱ्यावर असताना भर दुपारी रखरखत्या उन्हात एक शेतकरी बांधाकडेला रेडिओवर लताजींचे गाणे ऐकत बसला होता. गाडी थांबवून त्या शेतकऱ्याला त्यांनी विचारले. तुम्हाला कुणाची गाणी आवडतात, त्यावर शेतकऱ्याने लताजींच्या गाण्यांनी माझा कष्टाचा शीण निघून जातो. मला विरंगुळा मिळतो. म्हणून मी शेतात काम करतानाही लताजींचे गाणे ऐकण्यासाठी सकाळी येतानाच दुपारच्या जेवणाबरोबर रेडिओ आणतो, असे सांगितले. त्या वेळेलाच डॉ. भणगे यांनी लताजींना डी. लिट. देण्याचा संकल्प केला.

सकाळ

लता मंगेशकर यांच्या निधनामुळे विसाव्या शतकावर आणि रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा स्वर कायमचा निमाला आहे. मंगेशकर यांचे कोल्हापूरशी व शिवाजी विद्यापीठाशी स्नेहाचे नाते होते. विद्यापीठाने त्यांना डी. लिट. ही मानद पदवी तत्कालीन कुलगुरू डॉ. बी. एस. भणगे यांच्या हस्ते प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव केला होता. मंगेशकर यांच्या स्वरांनी जगभरातल्या संगीत रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविले. येथून पुढेही पिढ्यान् पिढ्यांवर त्यांच्या आवाजाची मोहिनी कायम राहणार आहे. त्यांच्या निधनामुळे संगीताच्या क्षेत्रात स्वयंप्रज्ञेने तळपणारी गानसम्राज्ञी काळाच्या पडद्याआड गेली आहे.

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शिवाजी विद्यापीठ

तरुण भारत



शिवाजी विद्यापीठाने २१ नोव्हेंबर १९७८ रोजी डी. लिट. ही सर्वोच्च सन्मानदर्शक पदवी प्रदान करून लता मंगेशकर यांना गौरविले आहे. गौरवपत्राचे वाचन करताना तत्कालीन कुलगुरू डॉ. बी. एस. भणगे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 FEB 2022 Times of India

# Lata Mangeshkar's journey of the highest note began in 1941 in Pune

Manjiri Damle

**Pune:** It was October 13, 1941. Several boys and girls had gathered to participate in a singing competition organized at the erstwhile Globe Talkies (later Shrinath Talkies) near Mahatma Phule Mandai in the heart of Pune for the release of the film *Khazanchi*.

Each participant had to render two songs from the film. An 11-year-old Lata Mangeshkar bagged the first prize comprising a silver medal and a musical instrument called dilruba. This was among the happy memories that the melody queen had about the Mangeshkar family's three-year stay in Pune.

Her participation in the competition had not gone down well with her father Master Deenanath, a giant of an artist in Marathi sangeet natak and a vocalist par excellence. "*Bakshis milawala nahis tar maza naak kapla jaail*... (I will lose face if you don't win a prize)," he had said.

She had recalled how her father had used the bow of the same dilruba to kill a mouse. When the bow broke, he told a weeping Lata that she should never let success go to her head and that she was destined to win many more awards.

While she was born in Indore, her siblings Asha, Usha, Meena and Hridaynath were all born in Sangli where Master Deenanath had started a theatre company.

Film scholar Sulabha Ternikar said the Mangeshkar family came to Pune in 1940 after Master Deenanath's Balwant Sangeet Natak Mandali, which later became Balwant Pictures, folded up and the family lost everything.

"They stayed in Rajiwdekar chawl near Globe Talkies. Later, they bought their own house at 750, Shukrawar Peth, but sold it after Master Deenanath died in April 1942. Lata Didi shifted to Kolhapur in 1943 and joined Prafulla Pictures of Master Vinayak as a salaried employee. A 13-year-old Lata became the support of the Mangeshkar family," she added.

Later, she joined Bhalji Pendharkar's Jaiprabha Studio in Kolhapur.

Though the years spent in Pune were marked by financial problems and grief, Mangeshkar forged some long-lasting ties with several Punekars. Among them was Charudatta Sarpotdar of Poona Guest House, whose mother used to send a tiffin for the Mangeshkar family every day. Charudatta's son Kishor recalled, "She used to call my father Charudada and send him a rakhi every year. She was a regular visitor to the Poona Guest House till 1945. Her favourite dishes were *ambadichi bhaji, aloochi bhaji, masale bhaat* and *bhakri*." Pune and Poona Guest House became pitstops when she travelled between Kolhapur and Mumbai.

She would order *ukadiche modak* (steamed modak) and *sajuk tupatil* (ghee) motichoor ladoo from the Sarpotdars. "She would scold me for not sending her the bill for these goodies. After Deenanath Mangeshkar Hospital was built, Lata Didi started placing orders for motichoor ladoo for the entire staff every Diwali," Sarpotdar, who cherishes the wristwatch she gifted him, said.

During the days in Rajiwadekar chawl, her father's early morning riyaz and his recitation of Sanskrit shlokas left a deep impression on her Their neighbour, called Sharma, was a follower of Arya Samaj and the Mangeshkar siblings would go to him to learn Sanskrit. Master Deenanath felt it would improve their diction and pronunciation.

She kept Pune close to her. She bought a flat in Mangesh Apartment near Neelayam theatre, set up the famous Hotel Sarja, and built the Deenanath Mangeshkar Hospital in memory of her father who could not get effective treatment during his last days.

## RELIVING THE PAST

Lata Mangeshkar, also known as the melody queen, is one of India's biggest and most loved singers. She has worked with the big names of Bollywood



Pic: Twitter account



Pic: Suryakant Asabe



Pic: Suresh Patil



Pic Courtesy: Shivaji University Kolhapur

1. Lata Mangeshkar was photographed for publicity of her first performance in Solapur in 1938

2. Lata Mangeshkar with her sister Usha Mangeshkar at Lord Vitthal Temple in Pandharpur

3. Lata Mangeshkar during the ceremony marked to celebrate the birth centenary of Master Deenanath Mangeshkar in Sangli in 2000

4. She received an honorary doctorate from Shivaji University Kolhapur, around 40 yrs ago

### Early Years In Sangli

Mangeshkar has said in interviews that her family's decade-long stay in Sangli was both of turmoil and learning. She went to Sangli in 2000 for her father's birth centenary. "The siblings shared the stage for a three-day programme we called Mangeshkarotsav. We renovated the old theatre and installed a bust of Master Deenanath which Lata didi liked the most," former Sangli mayor Suresh Patil said.

Mangeshkar had told interviewers that she made her singing debut in Solapur in 1938 for a musical by her father, but it was in Sangli during her formative years that she fine-tuned her singing sitting beside him.

She had immense faith in Sangli's Bagetla Ganapati. Photojournalist Uday Deolekar said once when he tried to take a photograph of her while she was in the temple, she stopped saying that her faith and worship is hers alone.

**—Abhijeet Patil in Kolhapur**